# जाहीरात

ईगतपुरी तालूक्यातील हातपंप दुरूस्ती कामासाठी दुरूस्ती पथकावर ११ महिन्याचे कालावधीसाठी रू.१०,०००/- प्रती महीना या प्रमाणे मानधनावर हातपंप दुरूस्ती कामाचा अनुभव असलेल्या यांत्रिकांची नेमणूक करावयाची आहे. यासाठी किमान १० ते १५ वर्षे हातपंप दुरूस्ती कामाचा अनुभव असलेली व्यक्ती अथवा शासकीय सेवेत हातपंप यांत्रिकी म्हणून काम केलेले, सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांकडून ११ महिन्याचे कालावधीसाठी मानधनावर काम करणेस ईच्छूक असलेल्या उमेदवाराकडून अर्ज मागविणेत येत आहेत. इच्छूकाने आवष्यक ते कागदपत्र व अनुभवाचे दाखल्यासह विहित प्रपत्रात दि.५/१/२०१८ पावेतो सादर करावेत.मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

विहित नमूण्यातील अर्ज उप अभियंता ( यांत्रिकी ) यांत्रिकी उप विभाग ,शिंगाडा तलाव जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे उपलब्ध आहेत.( फोन नं ०२५३-२५०४४५२ ) तसेच कामाच्या अटी व शर्ती कार्यालयात पहावयास मिळतील.

स्वाक्षरीत/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

# अर्जाचा नमुना

**- कार्यालय -**

उप अभियंता (यांत्रीकी)

यांत्रिकी उप विभाग ( ग्रापापु )

---

फोटो

१) अर्जदाराचे संपुर्ण नांव -

२) अर्जदाराची जन्मतारीख -

३) शैक्षणीक अर्हता -

४) अर्जदाराचा संपुर्ण पत्ता -

५) अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्र. -

६) कामाचा अनुभव - वर्षे

७) कामाचा अनुभव असल्याचे

सेस्थेचे प्रमाणपत्र -

ठिकाण - **अर्जदाराचे संपुर्ण नांव व स्वाक्षरी**

दिनांक -

# <u>नेमणुकीच्या शर्ती व अटी</u>

१) सदरची नेमणूक रु.१०,०००/- (रु. दहा हजार मात्र) प्रती महा प्रमाणे मानधनावर असुन तात्पुरत्या स्वरुपाची आहे.

२) नेमणुक काळात कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

३) नेमणुक काळात कोणत्याही प्रकारचा वैद्यकिय सेवेचा लाभ मिळणार नाही.

४) नेमणुक कालावधीत कोणत्याही प्रकारच्या शासकिय सुविधा उदा.अग्रीम,अर्जीत रजा किरकोळ रजा,व इतर भत्ते इ.मिळणार नाहीत.

५) शासकिय सुटटी व्यतीरिक्त गैरहजर राहील्यास त्या दिवसाचे वेतन मिळणार नाही.

६) सदरची नेमणूक उप अभियंता (यां) यांत्रिकी उप विभाग ग्रामीण पाणी पुरवठा जि प. नाशिक यांचे अधिपत्याखाली राहील.

८) सदरची नेमणूक पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात असुन या नेमणुकीमुळे कोणत्याही प्रकारचा शासकीय हक्क राहणार नाही.व या आदेशाच्या संबधाने आपणास न्यायालयात कोणतेही आव्हान देता येणार नाही.

९) मानधनाचे काम स्विकारणे पुर्वी उप अभियंता (यां) यांना रुपये १००/- चे कोर्ट फी स्टॅम्पवर स्व:ताचे खर्चाने करारनामा करुन द्यावा लागेल.

१०) सदरची नेमणुक अत्यंत तात्पुरत्या स्वरुपाची असुन काम असमाधान कारक आढळल्यास तात्काळ काम बंद करुन मानधन अदा केले जाणार नाही.

११) सदर मानधनावर होणारा खर्च हा हातपंप विजपंप दुरुस्ती योजनेचा नियमित खर्च ज्या ग्रामीण पाणी पुरवठा दुरुस्ती व देखभाल निधी मधुन होतो त्यातुनच कर्मचा-यांचे वेतन व भत्ते या सदरी केलेल्या तरतुदी मधुन करण्यात येईल.

१२) मानधन अदा करणेची संपुर्ण जबाबदारी म. उप अभियंता (यां) यांत्रिकी उप विभाग ग्रा.पा.पु.जि.प.नाशिक कार्यालयाची राहील.

१३) ईगतपुरी गटात काम नसतांना संबधीत हातपंप यांत्रिकी यांनी उप अभियंता (यां) यांत्रिकी उप विभाग ग्रा.पा.पु.जि.प.नाशिक यांचे आदेशान्वये कामकाज करावे लागेल.

स्वाक्षरीत/-

उप अभियंता (यां)

यांत्रिकी उप विभाग,जि.प.नाशिक.